# आकाशवाणी नागपूर,

# प्रादेशिक वृत्त विभाग

# प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

# मंगळवार दिनांक ०२ सप्टेंबर २०२५

## ठळक बातम्या

- **हैदराबाद गॅझेटियरच्या तात्काळ अंमलबजावणीची राज्य सरकारची तयारी.**
- **सेमिकॉन इंडिया २०२५चं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्‌घाटन, भारताची मायक्रोचीप जगाला दिशा देईल असा व्यक्त केला विश्वास.**
- **नागपूर महामेट्रोच्या कामठी रोड डबल-डेकर व्हायाडक्टची गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्स मध्ये नोंद.**
- **नागपूर जिल्ह्यात आज ऑरेंज अलर्ट, उद्या विदर्भाच्या बहुतांश जिल्ह्यात मुसळधार पावसाचा इशारा.**

<u>मराठा आरक्षण</u>

हैदराबाद गॅझेटियरच्या तात्काळ अंमलबजावणीची तयारी राज्य सरकारने आज दाखवली. मराठा आरक्षण प्रकरणी नेमलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी याबाबत आज मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांना माहिती दिली. आदेश प्राप्त झाल्यावर मुंबईत सुरू असलेले मराठा आरक्षण आंदोलन थांबवण्याची तयारी जरांगे यांनी आज दाखवली. सातारा गॅझेटिएरच्या अंमलबजावणीसाठी १५ दिवसात निर्णय घेण्याचं आश्वासन सुद्धा विखे पाटील यांनी दिलं. मराठा आंदोलनावर दाखल खटले मागे घेण्यासाठी महिना अखेर पर्यंत निर्णय घेऊ, मराठा आरक्षण आंदोलनात मृत्युमुखी पडलेल्या आंदोलकांच्या कुटुंबियांना आठवडाभरात आर्थिक मदत, मृत्युमुखी पडलेल्यांच्या वारसांना सरकारी महामंडळात नोकरी देण्याचं आश्वासन सुद्धा सरकारने आंदोलकांना दिलं आहे. मराठा आरक्षण आंदोलकांच्या वाहनांवर मुंबईत लादलेला दंड मागे घेण्याची सरकारची तयारीही सरकारने दाखवली. मराठा आणि कुणबी एकच असल्याचा GR काढण्यासाठी २ महिन्याची मुदत देण्याची विनंती सरकारने मनोज जरांगे यांना केली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी- सेमिकॉन इंडिया

सेमीकंडक्टरमध्ये जगाचा विकास करण्याची शक्ती असून, भविष्यात भारताची मायक्रो चीप जगाला दिशा देईल, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीतल्या यशोभूमी इथं आज सेमिकॉन इंडिया २०२५ चं उद्घाटन त्यांच्या हस्ते झालं, तेव्हां ते बोलत होते. सेमीकंडक्टर उद्योगाच्या विकासासाठी जग भारतावर विश्वास ठेवतं असं ते म्हणाले. जागतिक चिप बाजारपेठेत भारताच्या वाढत्या प्रभावावर त्यांनी भर दिला. २१ व्या शतकात, या लहान चिप्समध्ये मोठी शक्ती असल्याचं ते म्हणाले. याशिवाय त्यांनी गुंतवणूक दारांना भारतात गुंतवणूक करण्याचे आमंत्रण दिले.

***मैं सभी इन्वेस्टर्स से कहूंगा कि हम खुले दिल से आपका स्वागत करने के लिए तैयार हैं और आपकी भाषा में कहूं तो डिजाइन तैयार है। मास्क अलाइंड हैं, अब टाइम प्रिसेशन के साथ एजुकेशन करने का है और स्केल पर डिलीवर करने का है। हमारी पॉलिसी शॉर्टटर्म सिग्नल नहीं है। ये लॉन्ग टर्म कमिटमेंट है। आपकी हर जरूरत को हम पूरा करेंगे। वो दिन दूर नहीं जब पूरी दुनिया कहेगी 'डिजाइन इन इंडिया' 'मेड इन इंडिया'।***

येत्या काही वर्षांत जागतिक सेमीकंडक्टर बाजारपेठ एक ट्रिलियन डॉलर्स ओलांडण्याचा अंदाज आहे आणि भारत त्यात महत्त्वाची भूमिका बजावेल, असं मोदी यांनी म्हटलं. २०२१ पासून मंजूर झालेल्या १० सेमीकंडक्टर प्रकल्पांमध्ये १८ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक केली जात असल्याचं त्यांनी सांगितलं.

आधार कार्ड

सर्वोच्च न्यायालयाने एक महत्त्वपूर्ण निर्णय देताना स्पष्टपणे सांगितले आहे की, फक्त आधार कार्डाच्या आधारावर कोणालाही भारतीय नागरिक म्हणून मान्यता दिली जाऊ शकत नाही. बिहारमध्ये सुरू असलेल्या एसआयआर प्रक्रियेवरील सुनावणी दरम्यान न्यायालयाने ही टिप्पणी केली. न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाला बागची यांच्या खंडपीठाने सांगितले की, आधार कार्ड ओळखीचा पुरावा म्हणून वापरले जाऊ शकते, परंतु ते नागरिकत्वाचा पुरावा म्हणून ग्राह्य धरता येणार नाही. ही संपूर्ण सुनावणी राष्ट्रीय जनता दलाकडून दाखल करण्यात आलेल्या याचिकेच्या पार्श्वभूमीवर झाली.

अग्निवीर सैन्य भरती

विदर्भातील युवकांकरीता अग्निवीर सैन्य भरती मेळावा २०२५ चे आयोजन नागपूर जिल्हयातील गार्ड रेजिमेंटल सेंटर, कामठी इथं उद्या ०३ सप्टेंबर ते १२ दरम्यान आयोजित करण्यात आले आहे. जवळपास 5 हजार युवकांना या भरती प्रक्रियेसाठी बोलाविण्यात आलेले आहे. 10 दिवसाच्या या भरती प्रक्रियेमध्ये ज्यांनी लिखित परीक्षा पास केलेली आहे त्यांनाच शारीरिक आणि मेडिकल परीक्षणासाठी बोलाविण्यात आले आहे. पहिल्यांदाच गुजरात, महाराष्ट्र, गोवा, दादर नगर हवेली, दमण आणि दिव येथील उमेदवाराणा देखिल विविध पदासाठी शारीरिक आणि मेडिकल चाचणीसाठी बोलाविण्यात आलेले आहे.दरम्यान मध्यस्थी आणि दलालांच्या भूलथापांना बाली पडू नये असं, जनसंपर्क अधिकारी, ग्रुप कॅप्टन, रत्नाकर सिंग यांनी सांगितले -

***मैं बस ये बताना चाहूंगा की आप किसी तरह के बिचौलियों या टौउट्स होते है ना जो आपको कहेंगे की हम आपका करा देंगे, हम उनको जानते हैं और इस तरह से तो इनके चक्कर में नहीं पड़े। पूरा सिलेक्शन प्रोसीज़र पूरा मेरिट बेस्ड है और जो बच्चे में प्रतिभा है वही सिलेक्ट होगा। उसको किसी तरह की कोई भी बाहर से मदद नहीं कर सकती है। भले ही आपको कोई धोखा दे, वो सिर्फ आपको धोखा दे रहे हैं।अगर ऐसे कोई आपको पता चलता है तो हमें बताएं या वहां पे कन्सर्न्ड*** *ARO* ***को बताएं, ऑफिसर को बताएं और हम उनको फिर उचित कार्रवाई करेंगे ।***

प्रताप सरनाईक

राज्य सरकारने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एस.टी. महामंडळ) ताब्यातील अतिरिक्त जमिनींच्या व्यापारी तत्त्वावर वापरासंदर्भात महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार सार्वजनिक -खाजगी भागिदारीतुन विकसित होणाऱ्या प्रकल्पाच्या भाडेपट्टीची मुदत ही ६० वर्षावरून ९८ वर्षापर्यंत वाढवण्यात आली आहे. यामुळे एस.टी. महामंडळाच्या उत्पन्नात वाढ होऊन आर्थिक स्थैर्य साधण्यास मदत होणार आहे, असे प्रतिपादन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले आहे.

मेट्रो श्रेणी

महामेट्रो नागपूरच्या कामठी महामार्गावरील डबल डेकर वायाडक्टला गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्सने जगातील “सर्वात लांब मेट्रो डबल डेकर वायाडक्ट म्हणून मान्यता दिली आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत नागपूर येथील मुख्यमंत्री यांच्या शासकीय निवास्थान रामगिरी इथं हा कार्यक्रम आज संपन्न झाला. यावेळी गिनीज वर्ल्ड रेकॉर्डसचे स्वप्नील डांगरीकर यांनी महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांना फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थित प्रमाणपत्र प्रदान केले. कामठी महामार्गावरील डबल डेकर व्हायाडक्ट हा भारतातील सर्वात लांब डबल डेकर मेट्रो वायाडक्ट आहे. 5626.44 मीटर आहे. सर्वाधिक लांबीचा हा डबलडेकर उड्डाणपूल सिंगल कॉलम पिअरवर उभा असून स्थापत्य कलेचा अद्‌भूत उदाहरण आहे. सदर डबल डेकर वायाडक्टचे लोकार्पण केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते 5 ऑक्टोबर 2024 रोजी करण्यात आले होते.

<u>हवामान</u>

भारतीय हवामान खात्याने नागपूर जिल्हयात आज ऑरेंज अलर्ट दिला असून, काही ठिकाणी विज गर्जनेसह मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवलेली आहे. दरम्यान उद्‌या आणि परवा येलो अलर्ट असून या कालावधीमध्ये काही ठिकाणी वादळीवारा तसेच विज गर्जना व पावसाची शक्यता वर्तव ली आहे. सद्‌यस्थितीत नागपूर जिल्हयातील मोठे पाटबंधारे प्रकल्प जसे तोतलाडोह आणि नवेगाव खैरी हे ८५ टक्के क्षमतेने भरलेले असून वडगाव आणि नांद धरण हे जवळपास १००टक्के क्षमतेने भरलेली आहे. तसेच मध्यम स्वरूपाचे धरणे जवळपास १००% भरलेले आहेत. नदी व नाले हे पुर्ण क्षमतेने दुथडी भरून वाहत आहेत. या अनुषंगाने नागपूर जिल्हयातील नागरिकांनी आवश्यक काळजी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे. उद्‌या यवतमाळ, बुलढाणा, गोंदिया वगळता विदर्भात सर्वत्र मुसळधार पावसाचं इशारा देण्यात आला आहे. दरम्यान येत्या काही तासात विदर्भातील नागपूर, भंडारा, वर्धा, गोंदिया, गडचिरोली आणि अमरावती जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी विजांसह वादळ येण्याची शक्यता देखील हवामान खात्याने वर्तवली आहे.

<u>शिखर परिषद</u>

आजादी का अमृत महोत्सव वर्षानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात आयुष्य मंत्रालयाच्या राष्ट्रीय आयुष्य अभियान आणि राज्यांमध्ये क्षमता बांधणी या विषयावर शिखर परिषदेचे ३ आणि ४ सप्टेंबर रोजी दिल्ली येथे आयोजन करण्यात

आले आहे अशी माहिती बुलढाणा लोकसभा मतदारसंघाचे खासदार तथा राज्याचे केंद्रीय आयुष तथा आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी दिली आहे. नवी दिल्ली इथं होणाऱ्या कार्यक्रमांमध्ये राष्ट्रीय आयुष्य मिशनला बळकटी देणे, धोरणात्मक रित्या विस्तार, आयुर्वेद योग निसर्गोपचार, युनानी, सिद्धसेवा, यासह होमिओपॅथी प्रणाली एकत्रित आणून समग्र आरोग्य सेवेला प्रोत्साहन देणारा एक प्रमुख कार्यक्रम पार पडणार आहे ज्यामुळे क्षमता बांधणी वाढविण्यासाठी या आयुष्य विभागाच्या मंत्रालयाचे काम महत्त्वाचे असेल अशी माहिती जाधव यांनी दिली.

******